# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यापीठ परिसरातील बांबु बेटे विक्रीबाबत
## बातमी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बांबू बेटे काढणीकरिता परिपक्व झालेली आहे. बांबू बेटे जेथे आहे व जसे आहे, या अटी वर विक्रीकरिता दर मागविण्यात येत आहे. सदर दराचे कोटेशन कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती नांवाने विद्यापीठाच्या केंद्रीय आवक शाखेत दि. ०९/०१/२०२६ ला कार्यालयीन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त कोटेशन शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ४.३० वाजता उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडण्यात येतील. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. बांबू कापणी कंत्राट कोटेशनव्दारे (मुल्य ऑफर) सादर करण्यास ईच्छुक असल्यास प्रथम आपणांस रु. ५,०००/- (अक्षरी रु. पाच हजार फक्त) इतकी अनामत रक्कम म्हणून विद्यापीठ खाती जमा करावी लागेल किंवा डिमांड ड्रॉफ्ट **वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांच्या नावांने रक्कम भरल्याची पावती / डिमांड ड्रॉफ्ट आपल्या कोटेशन सोबत जोडावी लागेल, यासंबंधीच्या संपुर्ण अटी व शर्ती खरेदीदाराला लागू राहील. सर्वच कोटेशन कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार **"कुलसचिव" संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**, **अमरावती** यांनी राखुन ठेवलेला आहे.

यासंबंधीची संपुर्ण माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**कुलसचिव**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**( उद्यान विभाग )**

**' बांबू बेटे विक्रीकरिता अटी व शर्ती '**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे परिसरातील बांबूची बेटे जेथे आहे व जसे आहे या अटीवर बातमी प्रकाशित करुन खालील अटी व शर्तीचे अधिन राहून कोटेशन बोलाऊन विक्री करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

(१) बांबू कापणी कंत्राट कोटेशनव्दारे (मुल्य ऑफर) सादर करण्यास ईच्छुक असल्यास प्रथम आपणास रु. ५,०००/- (अक्षरी रु. पाच हजार फक्त) इतकी अनामत रक्कम म्हणून विद्यापीठ खाती जमा करावी लागेल. आणि रक्कम भरल्याची पावती निविदेसोबत जोडावी लागेल.

(२) अनामत रक्कम उच्चतम दर (मुल्य ऑफर) मान्य होताच वापस केली जाईल, परंतु ज्यांची कोटेशन (मुल्य ऑफर) स्विकारल्या जाईल त्यांची रक्कम सुरक्षा रकमेत समायोजीत केल्या जाईल. कोटेशनधारकांला एकूण रु. २०,०००/- "सुरक्षा ठेव" म्हणून जमा करावी लागेल.

(३) एकूण दराची (मुल्य ऑफर) पुर्ण रक्कम विद्यापीठ खाती जमा केल्यानंतर बांबू कापणीची व विद्यापीठ परिसराबाहेर नेण्याची परवानगी देण्यात येणार नाही. काम समाधानकारक संपल्यानंतर "सुरक्षा ठेव" (मुळ रक्कम) परत करण्यात येईल.

(४) सुधारीत आयकर नियम २०६ सी नुसार विक्री किंमतीवर नियमानुसार आयकर (TCS 2.5) आकारण्यात येईल. सदर आयकराची रक्कम खरेदीदारास १००% रकमेचा भरणा करतेवेळी करावा लागेल. आयकर अधिका-यांचे आयकरापासून सुट मिळण्याबाबत प्रमाणपत्र दिल्यास आयकरातून सुट देण्यात येईल. (Tax Collected at Sources)

(५) खरेदी केलेल्या बांबूची उचल खरेदीच्या तारखेपासून ६० दिवसापर्यत करता येईल. ती मुदत ३० दिवसापर्यत वाढवून देता येईल. परंतु त्याकरिता सुरूवातीचे ६० दिवस पुर्ण होण्याआधी मा.कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचकडे लेखी अर्ज करून त्याची परवानगी घ्यावी लागेल व ६१ व्या दिवसापासून माल उचल करेपर्यत रू. ५०/- प्रतिदिन याप्रमाणे जागा भाडे आकारण्यात येईल.

(६) कामाच्या वेळेस किंवा काम सुरू असतांना खरेदीदाराच्या मजुरांना कोणत्याहि प्रकारचा अपघात झाल्यास, ह्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत खरेदीदारांची राहील.

(७) माल वाहतुकीकरिता आवश्यक असलेला परवाना (Transit pass) वन विभागाकडून संबंधीत खरेदीदारास काढावा लागेल.

(८) खरेदी केलेल्या बांबूचे संरक्षण संबंधीत खरेदीदारास करावे लागेल. या कालावधीत खरेदी केलेल्या बांबूचे चोरी किंवा आगी पासून नुकसान झाल्यास, याला विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. त्यामुळे बांबू विक्रीच्या मूळ रकमेवर कोणताहि परिणाम होणार नाही.

(९) बांबू कापणे, व्यवस्थित एकत्र करणे, वाहून नेणे इत्यादी वर होणाऱ्या खर्च खरेदीदारास करावा लागेल तसेच या करिता कामाची वेळ सकाळी १०=३० ते सायंकाळी ६=०० वाजेपर्यत राहील.

(१०) बांबू परिसराबाहेर नेण्याकरिता ' **उद्यान अधिक्षक** ' खरेदीदाराला **गेटपास** देईल.

(११) बांबू कापणीकरिता कंत्राट घेणा-याने प्रक्षेत्रावरील मालमत्तेस (वृक्षराजीसह) नुकसान पोहचणार नाही याची खबरदारी घ्यावी लागेल. नुकसान झाल्यास विद्यापीठ निर्धारीत करेल त्याप्रमाणे नुकसान भरपाई वसूल केल्या जाईल.

(१२) बांबू कापणीच्या कमीत कमी दोन दिवस आधी कापणीसंबंधी ठेकेदाराने कुलसचिव व उद्यान अधिक्षक यांना लेखी सुचना द्यावी. कापलेले बांबू उद्यान अधिक्षकांनी ठेकेदारास परवानगी पत्र/गेटपास दिल्यानंतरच परिसराबाहेर नेता येईल.

(१३) कंत्राटदाराने प्रत्यक्षात बांबूची कापणी सुरू करण्यापुर्वी त्यांचेकडील बांबू कापणा-या व्यक्तींची पुर्ण नांवे, ओळखपत्र व पत्त्यासह यादी सुरक्षा विभाग व उद्यान विभागाला सादर करणे बंधनकारक राहील. तसेच बांबू कापणा-या अधिकृत व्यक्तींनी परिसरात प्रवेश करतांना व परिसर सोडतांना मुख्यप्रवेशव्दाराचे सुरक्षा रक्षकाजवळ असलेल्या नोंदवहीत स्वाक्षरी करून, कामाच्या हेतूबाबत नोंद करणे आवश्यक राहील.

(१४) विद्यापीठ परिसरात उपलब्ध असलेल्या बांबु बेटांची प्रत्यक्ष मोक्यावर जावून पाहणी व खात्री करूनच कोटेशन सादर करावे.

(१५) कोटेशनधारकाला सर्व अटी व शर्ती बिनशर्त मान्य आहेत असे गृहीत धरण्यात येवून त्या संबंधीत खरेदीदाराला बंधनकारक राहतील.

(१६) बांबू कापणीची कोटेशन (मुल्य ऑफर) स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, यांचेकडे सुरक्षित राहील.

वरील कोणतीही अटीचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास, भरलेली रक्कम जप्त करण्यात येवून, कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**कुलसचिव**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**